ePaper

## वैष्णवीच्या प्रकरणाचा तपास सीआयडीकडे द्यावा : मनोज जरांगे



| वर्ष - 8 | अंक - 291 || UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

### आतील पानांत


- ब्रूकने घेतला अविश्वसनीय कॅच!
- धावांचा पाऊस पाडला, वजन कमी केलं
- मला वेश्या असल्यासारखं वाटलं
- काळजी करू नका....राहुल गांधी


www.mahaenews.com | मंगळवार, दि. 27 मे 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## संपूर्ण राज्यात पावसाचे थैमान ; नागरिकांची दैना

# मुंबई; छे, छे,तुंबई!

### मुख्यमंत्री फडणवीस पाहणी दौऱ्यावर, एकनाथ शिंदे वॉररुममध्ये, अजितदादा थेट बांधावर !



### लाखो हेक्टर शेती पाण्याखाली; ;नदी, नाले, ओढे, बंधारे आणि रस्तेसुद्धा तुडुंब!



### मुंबई ऍट अ ग्लान्स...!

मे महिन्यातच मुंबई पावसामुळे कोलमडली आहे. गेल्या आठवड्यात अंधेरी सबवे आणि साकीनाका पाण्याखाली गेले होते. सोमवारी दक्षिण आणि मध्य मुंबईला महानगरपालिकेच्या कारभाराचा फटका बसला आहे. हिंदमाता आणि गांधी मार्केट हे नेहमीच पावसाळ्यात जलमय होणारे भाग पूर्णपणे पाण्याखाली गेले. वरळीतील मेट्रो स्टेशनची भिंत कोसळली, पाणी साचले, गटाराचे पाणी आत शिरले. केम्प्स कॉर्नरजवळील नव्या रस्त्याची दुरवस्था झाली. केईएम हॉस्पिटल, नेपियन्सी रोड, बीएमसी ची वॉर्ड ऑफिसेस आणि मंत्रालयाजवळसुद्धा पाणी साचले.

| मुंबई | प्रतिनिधी | महाईन्यूज

**गेल्या शंभर वर्षात पडला नव्हता एवढा पाऊस सोमवारी एकाच दिवसात पडला. संपूर्ण राज्यात पावसाने थैमान घातल्यामुळे नागरिकांची दैना उडाली. नदी, नाले, ओढे, बंधारे आणि रस्ते सुद्धा तुडुंब भरून वाहू लागले. मुंबईची अक्षरशः तुंबई झाली.**

#### मुख्यमंत्री,दोन्ही उपमुख्यमंत्री अॅक्शन मोडवर..

पावसाचे रौद्ररूप एवढे मोठे होते की लाखो हेक्टर शेती पाण्याखाली गेली. नागरीकांच्या बचावासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार 'अॅक्शन मोड' मध्ये आले. फडणवीस यांनी पाणी साठलेल्या भागाचे दौरे केले, एकनाथ शिंदे हे 'वॉर रूम' मधून सूचना देऊन नियंत्रण करीत होते तर अजित पवार थेट शेतकऱ्यांच्या बांधावर पोहोचले.

#### पावसामुळे सर्वत्र दाणादाण : हा:हाकार

महाराष्ट्रात मान्सूनचे आगमन झाले आहे. पुणे, मुंबई, कोकण, पश्चिम महाराष्ट्रासह राज्यातील उर्वरित भागातही प्रचंड प्रमाणात पाऊस कोसळत आहे. मुंबईत तर मान्सूनच्या पहिल्याच पावसात अनेक ठिकाणी रेल्वेरुळ पाण्याखाली गेले. काही ठिकाणी इमारती कोसळण्याच्या तर काही ठिकाणी झाडे उन्मळून पडण्याच्या घटना घडल्या. काही ठिकाणी जीवितहानीदेखील झाली आहे.

#### पावसाचा जोर आणखी चार-पाच दिवस !

आगामी चार ते पाच दिवसांत पावसाचा जोर आणखी वाढण्याची शक्यता हवामान खात्याने व्यक्त केली आहे. त्यामुळे सरकारने संपूर्ण यंत्रणा सर्वत्र सतर्क केली असून सर्व प्रकारची मदत नागरिकांना देण्यासाठी प्रशासन सज्ज झाले आहे.

#### विरारमध्ये महिलेचा मृत्यू

मुसळधार पावसामुळे विरारमध्ये मोठी दुर्घटना घडली. येथे स्लॅबचे प्लास्टर डोक्यावर पडल्याने तीस वर्षीय महिलेचा जागीच मृत्यू झाला आहे. मलबार हिलमध्ये संरक्षण भिंत कोसळली. ही घटना घडल्यानंतर आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांकडून या भागाची पाहणी करण्यात आली. या इमारतीमधील रहिवाशांना स्थलांतरीत करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

#### सी एम एस टी ला फटका..

या पहिल्या पावसाचा फटका सीएसएमटी रेल्वे स्थानकालाही बसला. येथे पावसामुळे एक झाड कोसळले आहे. हे झाड पार्किंगमध्ये होते. (उर्वरित वृत्त पान 2 वर)

# संपूर्ण राज्यात पावसाचे थैमान!

## राज्यात 35 वर्षांतील सर्वात मोठा पाऊस! यंदा पुणे जिल्ह्यात 1453 % वाढ

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महाराष्ट्रात गेल्या 35 वर्षांतील सर्वात जास्त पाऊस मे 2025 मध्ये पडला आहे. 1990 नंतरचा हा राज्यातील सर्वात मोठा पाऊस ठरला आहे. मे महिन्यात राज्यात अपवादात्मक मान्सूनपूर्व पाऊस पडला. रविवारी (दि. 25) सकाळीच मान्सून दाखल झाला आहे. त्यामुळे आत मात्र 24 मे पर्यंतचा पाऊस हा अवकाळी स्वरूपाचा रेकॉर्डवर धरला जाणार आहे. मे महिन्याचे आठ दिवस शिल्लक असतानाही पावसाचे प्रमाण ऐतिहासिक निकषांपेक्षा जास्त झाले आहे. 1 ते 24 मे 2025 दरम्यान, महाराष्ट्रात सरासरी 74.6 मिमी पाऊस पडला, जो 844 टक्के जास्त आहे. संपूर्ण मे महिन्यातील सरासरी 7.4 ते 11.4 मिमी इतकी आहे. त्यामुळे ही वाढ 844 टक्के इतकी नोंदवली गेली आहे.**



1990 नंतर मे महिन्यात झालेला हा सर्वाधिक पाऊस आहे, तेव्हा महाराष्ट्रात याच काळात 99.8 मिमी पाऊस पडला होता. येत्या काही दिवसांत राज्याच्या काही भागात मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा अंदाज भारतीय हवामान विभागाने वर्तवला आहे. यंदाचा पाऊस हा 1990 चा विक्रमही मोडू शकेल अशी शक्यता आहे. राज्यात मे महिन्यात सर्वाधिक पाऊस 1918 मध्ये 113.6 मिमी इतका नोंदवला गेला.

गेल्या तीन दशकांमधील महाराष्ट्रातील मे महिन्यातील पावसाच्या पद्धतींचे विश्लेषण केल्यास वर्षानुवर्षे लक्षणीय बदल दिसून आले आहेत, यावर्षी 74.6 मिमी पाऊस अलीकडील ट्रेंडपेक्षा नाट्यमय फरक आहे. आकडेवारीवरून असे दिसून येते की महाराष्ट्रात मे महिन्यात पाऊस सामान्यतः किरकोळ असतो, बहुतेक वर्षे या महिन्यात 10 ते 20 मिमी पेक्षा कमी पाऊस नोंदवला आहे. उल्लेखनीय अपवादांमध्ये 2006 (44.6 मिमी), 2021 (47.3 मिमी) आणि 1999 (34.2 मिमी) यांचा समावेश आहे.

### 'हे' सात उन्हाळे कोरडे

2007 ते 2014 हा काळ विशेषतः कोरडा राहिला. या सर्व वर्षांतील मे महिन्यात 10 मिमी पेक्षा कमी पाऊस पडला.

या वर्षी मे महिन्यात झालेल्या पावसाला आणखी एक पैलू होता. महाराष्ट्रातील सुमारे 30 हजार हेक्टर शेत जमिनीवर असामान्यपणे झालेल्या मान्सूनपूर्व पावसाचा परिणाम झाल्याचे कृषी तज्ज्ञांनी सांगितले आहे.

### यंदा पुणे जिल्ह्यात 1453 टक्के वाढ

पुणे जिल्ह्यातील 1901 पासून मे महिन्यातील पावसाचा रेकॉर्ड तपासला आता असे दिसते की, या महिन्यात आतापर्यंत 119.6 मिमी पाऊस पडला आहे. ही एकूण 1453 टक्के वाढ आहे. हवामान विभागाच्या आकडेवारीवरून असे दिसून आले आहे की, अलिकडच्या पावसाने जिल्ह्यासाठी मे महिन्यातील मागील सर्व नोंदी ओलांडून मोठा विक्रम केला आहे.

### या पूर्वीचा पुणे जिल्ह्यातील विक्रमी पाऊस (मिमी)

1918 : 108.1 मिमी
1933 : 181.6 मिमी
1961 : 114.2 मिमी
1960 : 104.3 मिमी
1961 : 148.8 मिमी

### धबधब्यात विद्यार्थी अडकले..

नवी मुंबईत खारघरमधील पांडवकडा धबधब्यावर धारावीतील काही विद्यार्थी अडकले होते. त्यांना बाहेर काढण्यात खारघर अग्निशमन दलाला यश आले आहे. येथे पाच जण अडकले होते. उल्हास नदीत तीन गुराखी अडकले होते.



### बदलापुरात तुफान पाऊस..

बदलापूरमध्ये आज अवघ्या चार तासात तब्बल १६० मिलिमीटर पावसाची नोंद झाली. उल्हास नदीने इशारा पातळी गाठल्यामुळे नगरपालिका प्रशासनाने नागरिकांना सुरक्षित स्थळी हलवले असून पूरस्थिती निर्माण झाल्यास बारा हजार नागरिकांचे स्थलांतर करण्यात येणार आहे.

### पुण्यात वीज पडून मृत्यू

जोदरार पावसामुळे पुण्यातही मोठे नुकसान झाले आहे. मासेमारी करणाऱ्या युवकाच्या अंगावर वीज पडल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला आहे. खेड तालुक्यातील भामा आसखेड धरणाच्या कडेला ही घटना घडली. संतोष गुलाब खांडवे असे या युवकाचे नाव आहे.

### पश्चिम महाराष्ट्र, कोकणातही मुसळधार..

पुण्याप्रमाणे सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर आणि कोकणाची संपूर्ण किनारपट्टी मुसळधार पावसाने व्यापली आहे. सर्वच ठिकाणी जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले आहे. शेतीची कामे अनेक ठिकाणी अपुरी असल्यामुळे शेतकऱ्यांपुढे एक मोठे प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे.

### पुणे जिल्ह्यातील तालुकावार पाऊस

पुणे : 154.7 : 458%
हवेली : 186.4 : 1921%
मुळशी : 121 : 696%
भोर : 160 : 717%
मावळ : 145.8 : 1104%
(वडगाव)
वेल्हा : 122.5 : 556%
जुन्नर : 105 : 1024%
खेड : 178 : 615.9%
(राजगुरुनगर)
आंबेगाव : 117.4 : 767%
(घोडेगाव)
शिरूर : 180.9 : 1021%
(घोदनदी)
बारामती : 220.9 : 928%
इंदापूर : 174.3 : 834%
दौंड : 224.6 : 1074%
पुरंदर : 196.8 : 891%
(सासवड).
पुणे जिल्हा : 168.5 : 748%
पुणे विभाग : 181.6 : 562%

### राजकीय आरोपांच्या फैरी!

मुंबापुरीच्या तुंबापुरीवरुन राजकीय वर्तुळात आता आरोपांच्या फैरी झडू लागल्या आहेत. मुंबई तुंबण्याला सत्ताधारी जबाबदार असल्याचा आरोप विरोधकांनी केला, तर सत्ताधारी मात्र उद्धव ठाकरेंकडे बोट दाखवत आहेत. मुंबई महानगरपालिकेत उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेची सत्ता होती त्यांनी काय केले असा प्रश्न भाजपाने विचारला आहे. तर मुंबई सुधारणा करण्याऐवजी भाजपा आणि शिंदे गटाने कमाई केली असा आरोप आदित्य ठाकरे यांनी केला आहे.

### पावसाची तडाखे बंद एन्ट्री..

पावसाच्या तडाखेबंद एन्ट्रीनं अवघ्या काही तासांत मुंबापुरीची तुंबापुरी करुन टाकली. मुंबईच्या मंत्रालय परिसरापासून ते मेट्रो स्टेशनपर्यंत सगळे काही पाण्याखाली गेले. मस्जिद स्टेशन परिसराचा तर स्विमिंगपूल झाला होता. मुंबईच्या भुयारी मेट्रोच्या वरळी स्टेशनवर आदित्य ठाकरे पाहणी करण्यासाठी गेले होते. त्यावेळी त्यांना तिथे अडवण्यात आले. भुयारी मेट्रोत पाणी शिरल्याने सरकारची पोलखोल झाल्याचा आरोप आदित्य ठाकरेंनी केला आहे.

### पहिल्याच पावसात मुंबईची तुंबई

पहिल्याच पावसात मुंबईची तुंबई झाली. पाऊस आणि मुंबईची तुंबई हे जणू समीकरणच बनले आहे. पाऊस आला की मुंबईत ठिकठिकाणी पाणी भरते. त्यामुळे रस्त्यावर काय आणि घरात काय पाणीच पाणी पाहायला मिळते.


## धनदांडग्यांच्या जमिनी वाचवण्यासाठी पालिकेचा भ्रष्ट कारभार; फौजदारी गुन्हा दाखल करण्याची मागणी

# सुधारित विकास आराखड्यात पूररेषेत हेराफेरी!

## माजी स्थायी समिती सभापती सिमा सावळे यांचा गंभीर आरोप

। पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने नुकताच जाहीर केलेला सुधारित विकास आराखडा (DP) हा केवळ शहरातील धनदांडग्या आणि प्रभावशाली व्यक्तींच्या हितासाठी तयार करण्यात आला असल्याचा गंभीर आरोप माजी स्थायी समिती सभापती सिमा सावळे यांनी केला आहे.**



पवना, इंद्रायणी आणि मुळा नदीच्या पूररेषेत धनदांडग्यांच्या जमिनी वाचवण्यासाठी अनेक ठिकाणी हेराफेरी केल्याचा धक्कादायक प्रकार घडल्याचे दिसून येत आहे. मोशी, चिखली, पिंपळे सौदागर, रहाटणी, किवळे आदी भागांसाठी पाटबंधारे विभागाने तयार केलेल्या काटछेद नकाश्यांच्या आधारे दर्शविलेल्या पूररेषा आणि याच भागातील सुधारित विकास आराखड्यात दर्शविण्यात आलेलया पूररेषा यामध्ये अनेक ठिकाणी मोठया प्रमाणात तफावत आढळून आली आहे. एकीकडे चिखलीतील कष्टकऱ्यांची घरे पूररेषेत असल्याच्या नावाखाली प्रशासनाने निर्दयपणे जमीनदोस्त केली, तर दुसरीकडे धनदांडग्यांच्या जमिनी वाचवण्यासाठी पूररेषेत हेराफेरी केली जाते, हा दुहेरी न्याय महानगरपालिकेच्या भ्रष्ट आणि गलथान कारभाराचे उत्तम उदाहरण असल्याचा घणाघात सावळे यांनी केला. या प्रकरणात सखोल चौकशी करून तत्काळ फौजदारी गुन्हा दाखल कऱावा, अशी मागणी त्यांनी केली आहे. जलसंपदा विभागाने (पूर्वीचा पाटबंधारे विभाग) पिंपरी-चिंचवडमधून वाहणाऱ्या पवना, इंद्रायणी आणि मुळा या नद्यांच्या पूररेषेचे काटछेद नकाशे प्रत्यक्ष जागेवरील पाहणी करून तयार केले होते. यामध्ये २५ वर्षांत येणारा पूर दर्शविणारी निळी पूररेषा (Blue Line) आणि १०० वर्षांत येणारा पूर दर्शविणारी लाल पूररेषा (Red Line) यांची आखणी करण्यात आली आहे. नियमानुसार, नदीपासून निळ्या पूररेषेच्या आतील क्षेत्रात कोणतेही बांधकाम करण्यास सक्त मनाई आहे. सुधारित विकास आराखड्यात पूररेषांची आखणी जलसंपदा विभागाने तयार केलेल्या काटछेद नकाशानुसारच केली असल्याचे नमूद करण्यात आले आहे. परंतु, प्रत्यक्षात चिखली येथील स. न. १६७०, स. न. २८१, मोशी येथील (जुना) स. न. ५८,५९, ६० व ७५, ७६, ७७, रहाटणी येथील स. न. १०५, १०२, १०१, १००, ९९ व पिपळे सौदागर मधील स. न. १८२, किवळे मधील स. न. ५५,५६ बाबतीत हेराफेरी झाल्याचे स्पष्टपणे दिसत आहे. जलसंपदा विभागाच्या नकाशानुसार या स. न. चे क्षेत्र नदी पातळी ते निळी पूररेषा क्षेत्रात येत असताना, सुधारित विकास आराखड्यात मात्र हे क्षेत्र वगळून ते निळ्या पूररेषेबाहेर दाखवण्यात आले आहे. सिमा सावळे यांनी हे गंभीर प्रकरण उघडकीस आणत सुधारित विकास आराखड्यातील हेराफेरी जनतेसमोर आणली आहे.

पिंपरी-चिंचवडमध्ये यापूर्वीही प्रशासनातील अधिकारी, बिल्डर आणि राजकीय नेते एकत्र येऊन सामान्य जनतेला कसे लुबाडतात, याची उदाहरणे समोर आली आहेत.

चिंचवड क्षेत्रासाठी पवना नदीची पूररेषा निश्चित करणारा एकच नकाशा पुण्याच्या पाटबंधारे विभागाने दिला असताना, त्याचा बनावट नकाशा तयार केल्याचे उघड झाले होते, ज्यामुळे एकाच क्षेत्रासाठी दोन भिन्न नकाशे तयार होऊन पूररेषेत तफावत आढळून आली होती. पूररेषा बदलल्याचे हे काही मोजके दाखले दिलेत, अशा प्रकारे तीनही नद्यांच्या पूररेषेत छेडछाड झाल्याचे लक्षात आले आहे.

### चिखलीच्या कष्टकऱ्यांवर बुलडोझर, धनदांडग्यांच्या जमिनी सुरक्षित

चिखली येथील सामान्य नागरिकांनी आपले आयुष्यभराचे कष्ट लावून उभारलेली घरे पूररेषेत येत असल्याच्या नावाखाली प्रशासनाने पाडून टाकली. त्यांच्या डोळ्यादेखत त्यांच्या घरांवर बुलडोझर फिरवण्यात आला, त्यांना बेघर करण्यात आले. ही कारवाई करताना प्रशासनाने जराही माणुसकी दाखवली नाही. तसेच पूररेषेत असलेल्या २,५३४ बेकायदेशीर बांधकामांवर कारवाई सुरू करणार असल्याचा निर्धार मनपा आयुक्त शेखर सिंग यांनी नुकताच व्यक्त केला आहे. मात्र, पिंपळे सौदागर येथे, पवना नदीच्या पूररेषेत परस्पर बदल करून धनदांडग्यांच्या जमिनी सुरक्षित ठेवण्यात आल्या आहेत. हा दुहेरी न्याय पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या गलथान कारभाराचे आणि भ्रष्ट्राचाराचे उत्तम उदाहरण असल्याचे सिमा सावळे यांनी म्हटलं आहे.

---

## राजेंद्र हगवणेला आश्रय; कर्नाटकच्या माजी मंत्र्याचा मुलगा गोत्यात

## कर्नाटकातील माजी मंत्र्याच्या मुलासह पाच जण गजाआड; वैष्णवी हगवणे मृत्यु प्रकरण

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**वैष्णवी हगवणे मृत्यु प्रकरणात पसार आरोपींना मदत केल्याप्रकरणी कर्नाटकचे माजी ऊर्जामंत्री वीरकुमार पाटील यांचा मुलगा प्रीतम पाटील याच्यासह पाच जणांना पोलीसांनी सोमवारी (दि.२६) रात्री अटक केली. या आरोपींना मंगळवारी (दि. २७) न्यायालयात हजर करण्यात येणार आहे. या अटकेमुळे या प्रकरणातील आरोपींची संख्या आता अकरावर पोहोचली आहे.**




प्रीतम वीरकुमार पाटील (वय ४७, रा. कोगनोळी, ता. चिकोडी, जि. बेळगाव, कर्नाटक) असे अटक करण्यात आलेल्या माजी मंत्र्याच्या चिरंजीवाचे नाव आहे. त्याच्यासह मोहन उर्फ बंडू उत्तम भेगडे (वय ६०, रा. वडगाव मावळ), बंडू लक्ष्मण फाटक (वय ५५, रा. लोणावळा), अमोल विजय जाधव (वय ३५, रा. पुसेगाव, ता. खटाव, जि. सातारा), राहुल दशरथ जाधव (वय ४५, रा. पुसेगाव, ता. खटाव, जि. सातारा) यांनाही अटक करण्यात आली आहे. वैष्णवी हगवणे मृत्यू प्रकरण समोर आल्यानंतर तब्बल सात दिवस पसार असणाऱ्या वैष्णवीचा सासरा राष्ट्रवादी अजित पवार गटाचा माजी तालुकाध्यक्ष राजेंद्र हगवणे आणि दीर सुशील या पिता-पुत्राला पोलीसांनी २२ मे रोजी अटक केली. पोलीस चौकशीत दोघे आरोपी लगतच्या तालुक्यात तसेच सातारा जिल्हा आणि कर्नाटकातील कुगनोळी येथे बलेनो, थार, इंडेव्हर अशा आलीशान कारमधून फिरल्याचे समोर आले. फार्म हाऊस, लॉज, शेतावर राहत यथेच्छ पार्ट्याही झोडल्याचे आणि मटणावर ताव मारल्याचेही समोर आले होते. पसार असताना राजेंद्र व सुशील हगवणे यांना या आरोपींनी आश्रय दिला. त्यांना लपवले. त्यांना राहण्याची सोय करून दिली, आर्थिक मदत पुरवली, अशी माहिती तपासात समोर आली आहे. कर्नाटकातील एका हेरिटेज रिसॉर्टमध्ये राजेंद्र हगवणेसाठी करण्यात आलेले बुकिंग प्रीतम पाटील यांच्या नावावर असल्याचेही उघड झाले आहे. सर्व आरोपींना मंगळवारी (दि. २७) न्यायालयात हजर करण्यात येणार असून, पोलिस कोठडीसाठी मागणी करण्यात येणार आहे.

### अश्व पाळण्याच्या छंदातून झाली मैत्री

आरोपी प्रितम पाटील याचे वडील वीरकुमार पाटील हे कर्नाटकात काँग्रेसचे सलग २८ वर्षे आमदार होते. त्यांनी ऊर्जामंत्रीपदाचा कार्यभारही सांभाळला होता. त्यांचे सुपुत्र अटकेत आल्यानंतर कर्नाटकासह महाराष्ट्रातही राजकीय प्रतिक्रिया उमटू लागल्या. राजेंद्र हगवणे, प्रितम पाटील या दोघांनाही अश्व पाळण्याचा छंद आहे. त्यातूनच त्यांची मैत्री झाली होती.

## श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची प्रवचने



### भगवंताचे स्मरण ही सद्बुद्धि

परमेश्वर सर्व ठिकाणी भरलेला आहे, सर्व विश्व व्यापून आहे. मग त्याच्या अस्तित्वाची जाणीव प्रत्येकाला का होत नाही ? ज्याची भावना प्रगल्भ झाली असेल, त्यालाच परमेश्वराचे अस्तित्व जाणवेल, इतरांना नाही. म्हणून तशी भावना असणे जरूर आहे, आणि ती उत्पन्न होण्यासाठी परमेश्वराच्या स्मरणाची आवश्यकता आहे. मी नामस्मरण करतो असे जो म्हणतो, तो माझ्यावर उपकार करतो असे मला वाटते; कारण जी व्यक्ती नामस्मरण करते, ती स्वतःचा उद्धार करून घेत असते, म्हणजे पर्यायाने माझ्यावर उपकारच करीत असते.

बुद्धिवाद्यांना एक शंका अशी येते की, परमेश्वर हा जर बुद्धिदाता आहे, तर मग दुर्बुद्धी झाली तर तो दोष माणसाचा कसा म्हणता येईल ? याला उत्तर असे की, बुद्धिदाता परमेश्वर आहे हे अगदी खरे; पण त्या बुद्धीची सद्बुद्धी किंवा दुर्बुद्धी का होते हे पाहणे जरूर आहे. प्रकाश-काळोख या दोहोलाही कारण सूर्यच असतो. सूर्याचे अस्तित्व हे उजेडाला आणि नास्तित्व हे काळोखाला कारण आहे. तसे, भगवंताचे स्मरण हे सद्बुद्धी ला आणि विस्मरण हे दुर्बुद्धीला कारण आहे. म्हणून, बुद्धिदाता परमेश्वर हे जरी खरे असले, तरी सद्बुद्धी वा दुर्बुद्धी ठेवणे हे मनुष्याच्या हातात आहे. भगवंताचे स्मरण ठेवले म्हणजे दुर्बुद्धी होणार नाही; म्हणून नेहमी भगवंताच्या स्मरणात राहावे; आणि याला उपाय म्हणजे नामस्मरण. सर्व सोडून भगवंताच्या स्मरणात राहिले पाहिजे; परंतु व्यवहार नीट करून त्यामध्ये भगवंताचे अनुसंधान ठेवणे, हे त्याहीपेक्षा श्रेष्ठ आहे. भगवंताच्या कृपेने प्राप्त झालेला आजचा दिवस आपण त्याच्याकडेच लावणे जरूर आहे. भगवंताचे अनुसंधान ठेवले म्हणजे दिवस त्याच्याकडे लागतो. अशा रीतीने आजचा दिवस भगवंताच्या अनुसंधानात घालविला तर आपल्याला नित्य दिवाळीच आहे. अनुसंधानात स्त्री-पुरुष, श्रीमंत-गरीब हे भेद नाहीत. इतर साधनांनी जे साधायचे, ते नुसत्या अनुसंधानाने साधते; हाच या युगाचा महिमा आहे. इतर विषय मनात न येता एकाच विषयावर मन एकाग्र होणे, याला अनुसंधान असे म्हणतात. भगवंताचे अनुसंधान हेच खरे पुण्य होय, आणि हीच आयुष्यात मिळविण्याची एकमेव गोष्ट होय. एक भगवंताचे अनुसंधान ठेवा, म्हणजे इतर सर्व गुण आपोआप मागे चालत येतील. भगवंताला अनन्यभावे अशी प्रार्थना करावी की, " देवा, प्रारब्धाने आलेले भोग येऊ देत, पण तुझे अनुसंधान मात्र चुकू देऊ नको. "

**बोधवचन : नाम व अनुसंधान चोवीस तास चालायला पाहिजे. तेथे दुसरी एखादे गोष्ट वेळेवर न झाली तर त्याचा आग्रह नसावा.**



## 'स्टेट'मेंट

अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक

# 'ऑपरेशन सिंदूर' चं यश, जगाला का बरं खुपतंय?

**दहशतवाद्यांच्या विरोधात भारताने हाती घेतलेल्या 'ऑपरेशन सिंदूर' च्या कारवाईनंतर भारताने जो प्रचंड विजय मिळवला आहे, सगळीकडे 'तिरंगा यात्रा' काढून जल्लोष सुरू आहे, चारही बाजूंनी पाकिस्तानला घेरून 'याद राखा..'चे इशारे दिले जात आहेत आणि विजय साजरा केला जात आहे, हे उघड्या डोळ्यांनी आपण पाहत आहोत..मग, असे असताना भारतावर आणि भारताच्या नेतृत्वावर शंका घेण्याची हिंमत संपूर्ण जगाची का होत आहे ? भारतावर त्यांचा विश्वास का नाही ?**

### भारताच्या पाठीशी कोणीच नाही?

अनेक संरक्षण तज्ज्ञांचे विश्लेषण पाहिले, या कारवाईकडे पाण्याचा अनेक राष्ट्रांचा दृष्टिकोन पाहिला, तर एक गोष्ट पटकन लक्षात येते, ती म्हणजे भारताच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहणारा एकही देश जगात सापडला नाही. तोंडी पाठिंबा दिला असेल, दहशतवादाच्या विरोधात वक्तव्य केले असेल, पण, भारताच्या पाठीशी अत्यंत खंबीरपणे उभे राहण्याचे मात्र प्रत्येकाने टाळले आहे, हे लक्षात घ्या!

### भारताची प्रतिनिधी मंडळे कशासाठी?

जगातील तेहतीस देशांना 'ऑपरेशन सिंदूर' आणि त्यानंतरची वस्तुस्थिती सांगण्यासाठी भारताच्या संसदीय कार्य व्यवहार मंत्रालयाने सात सर्वपक्षीय प्रतिनिधी मंडळे पाठवली आहेत. संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेतील सदस्य देशांसहित भारताच्या सहकारी देशांसमोर ही मंडळे रवाना झाली आहेत. पाकिस्तानने केलेल्या खोटारडेपणाचे आणि खोडसाळपणाचे संपूर्ण पुरावे देऊन त्यांचे पितळ उघडे पाडणे, हे काम या समित्यांना करायचे आहे. ज्या तेहतीस देशांची निवड झाली आहे, त्यात सामील सदस्य देश संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेचे स्थायी किंवा अस्थायी सदस्य आहेत. काही देश लवकरच सदस्य होणार आहेत.

### सर्व देश महत्त्वाचे, म्हणून..

या व्यतिरिक्त, इतर देश असे आहेत ज्यांचे म्हणणे जागतिक व्यासपीठावर महत्त्वाचे मानले जाते. संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेत एकूण १५ सदस्य आहेत. त्यापैकी पाच स्थायी सदस्य आहेत, तर १० अस्थायी सदस्य आहेत. स्थायी सदस्यांना 'व्हेटो पॉवर' असते, ज्यामुळे ते सुरक्षा परिषदेच्या कोणत्याही निर्णयाला विरोध करू शकतात. अस्थायी सदस्यांची निवड संयुक्त राष्ट्र महासभेमार्फत दोन वर्षांसाठी केली जाते. स्थायी सदस्य देशातचीन, फ्रान्स, रशिया, इंग्लंड आणि अमेरिका असून अस्थायी सदस्यांची




निवड संयुक्त राष्ट्र महासभेमार्फत दोन वर्षांसाठी केली जाते. त्यात डेन्मार्क, ग्रीस, पाकिस्तान, पनामा, सोमालिया समावेश होतो. संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषद सदस्य यादीनुसार, इतर सदस्य म्हणून अल्बेनिया, ब्राझील, कॅनडा, जर्मनी, जपान, मोरोक्को, रोमानिया, स्लोव्हाकिया, स्पेन, तुर्कस्तान, इराक यांचा समावेश होतो.

### भारताची कामगिरी अभिनंदनीय नाही का?

मग, प्रश्न हा उपस्थित होतो, की जग 'ऑपरेशन सिंदूर' वर विश्वास ठेवत नाही का ? आपल्या देशातील पर्यटकांना ठार मारणाऱ्या दहशतवाद्यांचा बीमोड करण्यासाठी केलेली कार्यवाही आणि त्यात ज्या पद्धतीने भारतीय सैन्य दलाने दहशतवाद्यांचे तळ उद्ध्वस्त केले ही कामगिरी अभिनंदनीय आहे. सरकारने अमेरिकेच्या दबावात माघार घेतली नसती, तर भारतीय लष्कराने आठवडाभरात पाकिस्तानला गुडघ्यावर आणले असते, हे कोणत्याही देशाला पटेल, असेच आहे. भारतीय नागरिकांची हत्या करणाऱ्या कार्यवाहीसाठी सरकारला प्रतिनिधी मंडळाच्या माध्यमातून भाजप सरकारला जगाच्या समोर सफाई का द्यावी लागते आहे ? पाकिस्तानचा दहशतवादी बुरखा टराटरा फाटला आहे, तरी देखील कूटनीति म्हणून देशाचे ५१ खासदार, माजी मंत्री तसेच आठ निवृत्त राजनैतिक अधिकारी असलेले प्रतिनिधी मंडळ का पाठवावे लागत आहे. जग विश्वगुरू म्हणवणाऱ्या मोदींवर विश्वास का ठेवत नाही ?

### मैत्री जोडण्याचा प्रयत्न, तरीही..

जगातल्या अनेक देशांची वारी करून मैत्री जोडण्याचा प्रयत्न करण्यात आला होता. मात्र, तरीही हे देश आपल्या बरोबर का उभे राहिले नाहीत? हा प्रश्न अस्वस्थ करणारा आहे. आपले परराष्ट्र धोरण फसले की मोदी आणि भाजपा दावा करीत असलेली दहशतवाद्यांविरुद्धची कारवाई जगाच्या पचनी पडत नाही ? जग पाकिस्तानसारख्या देशावर विश्वास कसा ठेवू शकते ? ज्या देशात ओसामा बिन लादेन लपतो, दहशतवादाचे माहेरघर असलेल्या देशावर भारतापेक्षा जास्त जगाला विश्वास कसा असू शकतो ? त्यातही, अधिक धक्कादायक होते ते आंतरराष्ट्रीय नाणेनिधीकडून पाकिस्तानला एक अब्ज डॉलरचे दिलेले कर्ज ! कुठल्याही दोन देशात संघर्ष सुरू असताना असा निर्णय कसा घेतला जातो ? जगातील चौथी अर्थव्यवस्था असलेल्या भारताला इतके हलक्यात कसे घेतले जाते ?

### नरेंद्र मोदींच्या आदेशावर आक्षेप..

मात्र, त्याची उत्तरे देण्याऐवजी युद्धविराम हा मोठा विजय असल्याच्या थाटात भाजपा, मोदी सरकार आणि मोदीभक्त स्वतःची पाठ थोपटून घेण्यात मग्न आहेत. त्याची सुरुवात देखील अशाच प्रकारे खोटा प्रकार करून झाली होती, की मोदींनी तिन्ही सैन्य दलाला बोलवून कार्यवाही करण्याची मोकळीक दिली आहे, देशाच्या सैन्य दलाचे घटनात्मक प्रमुख राष्ट्रपती असताना मोदी कसा आदेश देऊ शकतात ? यावर आक्षेप घेतला जात आहे. परदेशी पाठवण्यासाठी सरकारने प्रतिनिधी मंडळ नियुक्त करताना काँग्रेसच्या शशी थरूर यांच्याकडे अमेरिकेला जाणाऱ्या गटाचे नेतृत्व सोपवले आहे.

### हतबल काँग्रेसची मूक संमती..

विशेष म्हणजे संसदीय कार्यमंत्री किरण रिजीजू यांनी लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी तसेच काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांच्याकडे या प्रतिनिधी मंडळात समाविष्ट करण्यासाठी काँग्रेसच्या चार खासदारांची नावे मागितली होती. काँग्रेसने आनंद शर्मा, गौरव गोगोई, डॉ. सैयद नासीर हुसेन आणि राजा बरार यांची नावे पाठवली होती. भाजपा सरकारने केवळ आनंद शर्मा यांचे नाव घेतले आणि शशी थरूर, मनीष तिवारी, सलमान खुर्शीद आणि अमर सिंह यांचा समावेश केला ! काँग्रेसने मात्र शशी थरूर किंवा मनीष तिवारी यांना पक्ष पातळीवर समज देण्याची गरज होती. काँग्रेसचे निर्णय भाजपा घेत असेल आणि काँग्रेस त्याला मूक संमती देत असेल तर याचा अर्थ काय ? एखाद्या राष्ट्रीय पक्षाच्या वतीने देशासाठी जाणारे खासदार किंवा कूटनीतीक भाजपा ठरवते आणि काँग्रेस निमूट मान्य करते, याचा अर्थ काय ? असा प्रश्न विचारून काहींनी काँग्रेसची खिल्ली उडवली आहे.

### भारताला मोठा पल्ला गाठायचाय..

'ऑपरेशन सिंदूर' ही फक्त एक झलक झाली आहे. भारताला अजून मोठा पल्ला गाठायचा आहे. भारताची अर्थव्यवस्था चौथ्या क्रमांकावर पोहचली असून येत्या दोन ते तीन वर्षात आपण तिसऱ्या क्रमांकावर जाणार आहोत. एवढी प्रचंड ताकद असताना त्या प्रमाणात जगावर दबदबा असणे महत्त्वाचे आहे.. वेळप्रसंगी, अमेरिका आणि चीनला सुद्धा अंगावर घेण्याची ताकद भारतामध्ये असायला हवी, तरच आपण स्वतःला 'विश्वगुरू' म्हणत पाठ थोपटून घेऊ शकतो !

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

## मे महिन्याच्या सुरुवातीपासून सुरू असलेल्या पावसामुळे नाशिक परिसरातील उन्हाळी कांद्याचे नुकसान

# उन्हाळी कांदा, कडधान्ये, आंबा मातीमोल!

## राज्यभरात 34,842 हेक्टरवरील पिकांचे नुकसान

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**राज्यभरात मे महिन्यात झालेल्या वळीव, पूर्वमोसमी पावसामुळे सुमारे ३४ हजार ८४२ हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले आहे. नुकसानीचा सर्वात मोठा फटका अमरावती, जळगाव, नाशिक, जालना, चंद्रपूर, अहिल्यानगर आणि सोलापूर जिल्ह्यांना बसला आहे. उन्हाळी कांदा, कडधान्ये, आंबा आणि भाजीपाला पिके मातीमोल झाली आहेत.**



राज्यात मे महिन्याच्या सुरुवातीपासून वळवाच्या पावसाला सुरुवात झाली. या पावसाचा सर्वाधिक फटका अमरावती जिल्ह्याला बसला असून, १२ हजार २९५ हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले आहे. अमरावतीतील अचलपूर, भातकुली, चांदूर बाजार, चिखलदरा, धारणी, अमरावती, वरूड, चांदूर रेल्वे, तिवसा, धामणगाव रेल्वे तालुक्यांतील पिकांचे नुकसान झाले आहे. त्या खालोखाल जळगावमध्ये ४ हजार ५३८, बुलढाणा ४ हजार, नाशिक ३ हजार २३०, जालना १ हजार ७२६, सोलापूर १ हजार २५२, चंद्रपूर १ हजार ३०८ आणि अकोल्यात ९०९ हेक्टरवरील पिके मातीमोल झाली आहेत.

### नाशिकसह राज्यभरात उन्हाळी कांदा भिजला

मे महिन्याच्या सुरुवातीपासून सुरू असलेल्या पावसामुळे नाशिक परिसरातील उन्हाळी कांद्याचे मोठे नुकसान झाले आहे. सतत पाऊस सुरू असल्यामुळे काढणीला आलेला कांदा शेतातून बाहेर काढता आला नाही. कांद्यातील पाण्याचा अंश कमी होण्यासाठी बांधावर, झाडाखाली ठेवलेला कांदा भिजला आहे. हवेतील आद्रतेत अचानक वाढ झाल्यामुळे चाळीतील कांद्याला कोंब येऊन कांदा सडण्याची भिती निर्माण झाली आहे. नाशिकसह धुळे, नंदूरबार, अहिल्यानगर, पुणे, सोलापूर, सातारा, जळगाव, अमरावती आणि अकोला जिल्ह्यांतही कांदा पिकाचे नुकसान झाले आहे.

### जुन्नर हापूस, मराठवाड्यातील केशर कवडीमोल

वळीव पावसामुळे जुन्नर परिसरातील जुन्नर हापूस आणि केशर आंब्याचे मोठे नुकसान झाले आहे.

कोकणातील हापूस आंबा समाप्त झाल्यानंतर जूनअखेरपर्यंत जुन्नर आणि मराठवाड्यातील केशर आंब्याची बाजारात आवक सुरू होते. पण, वादळी वाऱ्यासह वळवाच्या पावसामुळे पक्व आंबे तुटून पडले आहेत. झाडांखाली आंब्याचा खच पडला आहे. छत्रपती संभाजीनगरसह मराठवाड्यात केशर आंब्याचे क्षेत्र मोठे आहे. वादळी वाऱ्यासह झालेल्या पावसामुळे केशर आंब्याचे मोठे नुकसान झाले.

> राज्यभरात झालेल्या पूर्वमोसमी पावसामुळे शेतीपिकांचे मोठे नुकसान झाले आहे. संकटाच्या काळात सरकार शेतकऱ्यांच्या पाठिशी खंबीरपणे उभे आहे. नुकसानीचे तातडीने पंचनामे करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.
>
> –माणिकराव कोकाटे, कृषिमंत्री.

---

## बीड हादरलं! गाडी डिव्हायडरवर चढली

## जीव वाचताच सगळे उतरले, मागून ट्रकने सहाही जणांना चिरडलं

। सातारा ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**बीड जिल्ह्यातील गेवराईजवळ गढी पुलावर भीषण अपघात झाला. एका एसयूव्ही गाडीचा किरकोळ अपघात झाल्यानंतर, गाडीतील लोक ती काढण्यासाठी बाहेर आले असताना भरधाव ट्रकने सहा जणांना उडवले, ज्यात त्यांचा जागीच मृत्यू झाला.**



बीडमधून मोठी बातमी समोर आली आहे. जिल्ह्यातून जाणाऱ्या धुळे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरील गढी पूल येथे अंगावर काटा आणणार अपघात झाला आहे. या अपघातामध्ये सहा जणांचाा जागेवरच मृत्यू झाला आहे. विशेष म्हणजे गाडीचा अपघात झाला त्यावेळी वाचले कोणलाही कसलाही इजा झाली नाही. मात्र त्यानंतर दुसऱ्यांदा झालेल्या अपघतामध्ये एकाच वेळी सहा जणांचा मृत्यू झाला. गेवराईच्या शहराजवळ असणाऱ्या गढी पूलावर हा अपघात झालेला आहे. सहा जणांच्या अपघाती निधनाने गेवराईवर शोककळा पसरली आहे.

### काळाने घाला घातलाच...

ट्रकने दिलेली धडक इतकी भीषण होती की, सहाजण दूरवर फेकले गेले. सहा जणांचे मृतदेह वेगवेगळ्या ठिकाणी पडले होते. अपघात झाल्यावर संबंधित ट्रक चालकाने तिथून पळ काढला. या अपघाताची माहिती समजताच पोलीस घटनास्थळी दाखल झाले होते. पहिल्यांदा झालेल्या अपघातामधून वाचले पण त्यानंतर मात्र काळाने त्यांच्यावर घाल घातलाच. या अपघातामध्ये सहा जणांना आपले प्राण गमवावे लागले.

बीडमधील गेवराई शहरानजीक असणाऱ्या गढी पुलावर एका एसयूव्ही वाहनाचा डिव्हायडरवर धडकून किरकोळ अपघात झाला.

या अपघातात कोणीही जखमी झाले नव्हते. मात्र डिव्हायडरमध्ये अडकलेली गाडी बाहेर काढण्यासाठी गाडीतील सर्वजण बाहेर आले. याच दरम्यान महामार्गावरून जाणाऱ्या भरधाव ट्रकने सहा जणांना जबरदस्त धडक दिली आणि यात यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. हा अपघात मध्यरात्री झाला आहे. बाळू आतकरे, मनोज करांडे, कृष्णा जाधव, दीपक सरोया, भागवत परळकर आणि सचिन ननवरे यांचा मृत्यू झाला असून एका गंभीर जखमी व्यक्तीवर उपचार सुरू आहेत.

# भारतद्वेष हेच "पाकिस्तानचे ध्येय!

## गुजरात दौऱ्यात पंतप्रधान मोदी यांचा पाकिस्तानवर हल्ला

। दाहोद (गुजरात) ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**"पाकिस्तानचे एकमेव ध्येय भारताचा द्वेष करणे आणि शेजाऱ्यांना हानी पोहोचवणे आहे, तर भारताचे ध्येय गरिबी दूर करणे आणि आर्थिक विकास घडवून आणण्याचे आहे," असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोमवारी गुजरातमध्ये दाहोद येथील सभेला उद्देशून केलेल्या भाषणात केले. आमच्या बहिणींचे 'सिंदूर' पुसण्याचे धाडस करणाऱ्यांचा अंत निश्चित आहे, अशी टीका पंतप्रधानांनी पाकिस्तानवर केली.**



पंतप्रधानांनी यावेळी 'ऑपरेशन सिंदूर'चे कौतुक केले आणि ही केवळ लष्करी कारवाई नसून भारताच्या नीतिमत्ता आणि भावनांची सखोल अभिव्यक्ती असल्याचे वर्णन केले. "पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि मोदी शांत कसे बसू शकतात? जो कोणी आपल्या बहिणींच्या कपाळावरील 'सिंदूर' पुसण्याचे धाडस करेल, तो निश्चितच संपेल," असे पंतप्रधान म्हणाले. मोदींविरुद्ध लढणे किती कठीण असेल याची दहशतवाद्यांनी स्वप्नातही कल्पना केली नसेल. २६ मे २०१४ रोजी देशाच्या नागरिकांनी 'प्रधानसेवक' बनवताना दिलेल्या जबाबदारीचा हा एक भाग असल्याचे पंतप्रधानांनी सांगितले.

पंतप्रधान मोदींनी दाहोद येथे २४,००० कोटी रुपयांच्या विकास प्रकल्पांचे उद्घाटन केले. देशातील पहिल्या ९,००० अश्वशक्तीच्या लोकोमोटिव्ह इंजिनचे तसेच २१,४०५ कोटी रुपये खर्चून बांधलेल्या रोलिंग स्टॉक वर्कशॉपचे अनावरण त्यांनी केले. अहमदाबाद-वेरावळ वंदे भारत सेवा आणि वलसाड-दाहोद एक्सप्रेस गाड्यांना त्यांनी हिरवा झेंडा दाखवला.

### 'भारतीय उत्पादनांना प्राधान्य द्या'

भारताचे ध्यये विकसित राष्ट्र बनणे असून जनतेने 'मेड इन इंडिया' उत्पादनांना प्राधान्य द्यावे, असे आवाहन पंतप्रधानांनी केले. होळी, दिवाळी, गणेशोत्सव या सणांमध्ये परदेशी वस्तूंऐवजी भारतीय उत्पादने वापरावी, असे पंतप्रधान म्हणाले. भारतीय सणांमध्ये फटाके, गणेशमूर्ती यांसारख्या आयात केलेल्या वस्तूंच्या वापराबाबत पंतप्रधानांनी दु:ख व्यक्त केले आणि आयात केलेल्या वस्तू थांबवल्या पाहिजे, असे आवाहन त्यांनी केले.

### 'ऑपरेशन सिंदूर'चे उपराष्ट्रपतींकडून कौतुक

भोपाळ : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारताने पहलगाम हल्ल्याला अतिशय चोख प्रत्युत्तर दिले आहे आणि जगभरात स्पष्ट संदेश दिला आहे की दहशतवाद कोणत्याही किमतीत खपवून घेतला जाणार नाही, असे उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी सोमवारी मध्य प्रदेशातील नरसिंहपूर येथे एका कार्यक्रमात सांगितले. दहशवादाविरोधात राबवलेल्या 'ऑपरेशन सिंदूर'चे उपराष्ट्रपतींनी कौतुक केले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भूमिका अशी होती की ज्यांनी आपल्या बहिणींचे कोट्यवधी सिंदूर पुसले आहेत, त्यांना या पृथ्वीवर जगण्याचा अधिकार नाही आणि पहलगाममधील दहशतवादी हल्ल्याविरुद्ध संपूर्ण देश देशभक्तीच्या भावनेने एकजूट राहिला आहे, अशी प्रशंसा धनखड यांनी केली.

भारताने बहावलपूर, मुरीदके आणि इतर ठिकाणी झालेल्या दहशतवादी हल्ल्यांना अचूक बॉम्बस्फोटांद्वारे प्रत्युत्तर दिले आहे, ते जगाने मान्य केले आहे असेही धनखड म्हणाले.

# जातीनिहाय जनगणनेवरून काँग्रेस आक्रमक

## मोदी यांच्या जुन्या ध्वनिचित्रफिती प्रसारित करून टीका

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**नवी दिल्ली : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी जातीनिहाय जनगणना करण्याच्या निर्णयाची प्रशंसा केल्यानंतर काँग्रेसने सोमवारी दोन ध्वनिचित्रफिती प्रसिद्ध करून मोदी यांच्यावर टीका केली आहे. या ध्वनिचित्रफितींमध्ये पंतप्रधान मोदी हे जातीनिहाय जनगणना घेण्याच्या विरोधकांच्या मागणीवर टीका करताना दिसत आहेत.**



दिल्लीमध्ये रविवारी आयोजित करण्यात आलेल्या रालोआशासित मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांच्या बैठकीत पंतप्रधान मोदी यांनी जातीनिहाय जनगणना करण्याच्या निर्णयाचे समर्थन केले होते. यामुळे विकासात मागे राहिलेल्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी एक पाऊल आहे, असा विश्वास पंतप्रधानांनी व्यक्त केला होता. काँग्रेसच्या माध्यम विभागाचे प्रमुख आणि पक्षाचे सरचिटणीस जयराम रमेश यांनी पंतप्रधान मोदी यांच्या या दोन ध्वनिचित्रफिती 'एक्स'वरून सामायिक केल्या. रालोआ मुख्यमंत्र्यांच्या बैठकीत मोदी यांनी अपेक्षेप्रमाणे जातीनिहाय जनगणनेचे सर्व श्रेय घेतले अशी टीकाही रमेश यांनी केली. रालोआ मुख्यमंत्र्यांच्या बैठकीत आणीबाणीला ५० वर्षे पूर्ण होत असताना काँग्रेसला लक्ष्य करण्याची रणनीती निश्चित करण्यात आली.

तो धागा पकडून काँग्रेसने पंतप्रधान मोदी यांची ११ वर्षांची राजवट ही अघोषित आणीबाणी असल्याची टीका केली. मोदींचे चांगल्या दिवसांचे आश्वासन हे वास्तवात दु:स्वप्न ठरले असल्याची टीका पक्षाने केली.

### मोदींची विरोधातील वक्तव्ये

२ ऑक्टोबर २०२३च्या ध्वनिचित्रफितीत मोदी असे म्हणताना ऐकायला मिळते की, "ते (विरोधक) समाजाची जातीच्या आधारावर विभागणी करत असत आणि अजूनही ते हे पाप करत आहेत." तर २८ एप्रिल २०२४ रोजी मोदी म्हणाले होते की, "जातीनिहाय जनगणनेची काँग्रेसची मागणी हा त्यांच्या शहरी नक्षली मानसिकतेचा भाग आहे."

### या संदर्भात, काँग्रेस पक्ष काय म्हणतोय:

**सामाजिक न्यायाचा मुद्दा:** काँग्रेसचा असा युक्तिवाद आहे की जातींची अचूक माहिती उपलब्ध झाल्यास सरकारला सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या वर्गांसाठी अधिक प्रभावी धोरणं तयार करता येतील.

**आरक्षणाचा पुनर्विचार:** जातीनिहाय आकडेवारीमुळे आरक्षण धोरणात बदल करणे, किंवा ते अधिक न्याय्य बनवणे शक्य होईल, असं काँग्रेसचं म्हणणं आहे.


**भाजपवर टीका:** काँग्रेसने सत्ताधारी भाजप सरकारवर आरोप केला आहे की ते जातीगत जनगणना टाळत आहे, कारण त्यांना सामाजिक विषमतेचे वास्तव जनतेसमोर यायला नको आहे.


**राजकीय गणित:** काँग्रेस अनेक राज्यांमध्ये ओबीसी, दलित आणि इतर मागासवर्गीय मतदारांना आकर्षित करण्यासाठी हा मुद्दा पुढे नेत आहे.

# ऐश्वर्या नारकरांचा मुलगा भारतात परतला!

अलीकडच्या काळात सगळेच कलाकार सोशल मीडियावर सक्रिय असतात. काही दिवसांपूर्वीच इन्स्टाग्राममध्ये 'आस्क मी सेशन'मध्ये 'झी मराठी'च्या लोकप्रिय नायिकेने प्रेमाची कबुली दिली होती. या अभिनेत्रीचं नाव आहे ईशा संजय. 'झी मराठी'च्या 'लाखात एक आमचा दादा' या मालिकेमुळे ईशा घराघरांत लोकप्रिय झाली आहे. यामध्ये ती सूर्या दादाच्या बहिणीची म्हणजेच राजश्री (राजू) ही भूमिका साकारत आहे.

ईशाला एका नेटकऱ्याने "तुझं लग्न झालंय का दीदी?" असा प्रश्न विचारला होता. यावर अभिनेत्रीने अमेय नारकरबरोबरचा फोटो शेअर करत नेटकऱ्याला, "लग्न नाही झालंय कारण, कोणीतरी खूप दूर आहे सध्या" असं उत्तर दिलं होतं. यामुळे दोघंही लाँग डिस्टंस रिलेशनशिपमध्ये आहेत हे स्पष्ट झालं होतं. यासह आता अभिनेत्रीने नुकताच शेअर केलेला व्हिडीओ देखील चर्चेत आला आहे. अमेय हा ऐश्वर्या व अविनाश नारकरांचा मुलगा आहे. सध्या अमेय परदेशात उच्चशिक्षण घेत आहे. त्यालाही इंडस्ट्रीत करिअर करायचं आहे. असं ऐश्वर्या यांनी एका मुलाखतीत सांगितलं होतं. नुकताच तो भारतात परतला आहे. यावेळी एअरपोर्टवर त्याचं स्वागत करण्यासाठी पुष्पगुच्छ घेऊन ईशा पोहोचली होती. अमेयला अनेक महिन्यांनी पाहिल्यावर तिने पटकन धावत जाऊन त्याला मिठी मारल्याचं या व्हिडीओमध्ये पाहायला मिळत आहे.





## 'जिस्म'मध्ये काम न करण्याचा अनेकांनी दिलेला सल्ला

'राज', 'जिस्म', 'नो एंट्री', 'ओमकारा', 'बचना ऐ हसीनों', 'रेस' व 'आक्रोश' यांसारख्या अनेक चित्रपटांमधून प्रेक्षकांच्या भेटीला आलेली अभिनेत्री म्हणजे बिपाशा बासू. २७ वर्षांपूर्वी मॉडेलिंगच्या क्षेत्रात नाव कमवल्यानंतर तिने मनोरंजन क्षेत्रात येण्याचा निर्णय घेतला. मग अभिनेता अक्षय कुमारबरोबर बॉलीवूडमध्ये पदार्पण केलं. 'अजनबी' हा तिचा पहिला चित्रपट होता. बिपाशा बासूची यशस्वी कारकीर्द सुरू असतानाच तिला एक असा चित्रपट ऑफर झाला, जो न करण्यासाठी तिला अनेकांनी सल्ला दिला होता. हा चित्रपट म्हणजे 'जिस्म'. तिच्या कारकीर्दीतला हा एक महत्त्वाचा चित्रपट होता. पण तिला अनेकांनी या चित्रपटात काम न करण्यासाठी सल्ला दिला होता. याबद्दल तिने 'टाइम्स नाऊ'शी तिची प्रतिक्रिया व्यक्त केली. २००३ मध्ये 'जिस्म' हा चित्रपट प्रदर्शित झाला. जॉन अब्राहमने या चित्रपटाद्वारे बॉलीवूडमध्ये पदार्पण केले. त्यावेळी, बिपाशा हे इंडस्ट्रीमध्ये आधीच प्रसिद्ध व लोकप्रिय असलेलं नाव होतं. त्यामुळे या चित्रपटामुळे तिच्या यशस्वी कारकिर्दीला धक्का लागू शकतो, यामुळे अनेकांनी तिला या चित्रपटात काम न करण्याचा सल्ला दिला होता. मात्र तरीदेखील बिपाशाने यात काम केलं.



## अन् मुख्य नायिकेला अश्रू अनावर!

'झी मराठी'च्या 'तुला शिकवीन चांगलाच धडा' आणि 'नवरी मिळे हिटलरला' या दोन मालिकांनी नुकताच प्रेक्षकांचा निरोप घेतला. या दोन्ही मालिकांची निर्मिती शर्मिष्ठा राऊतने केली होती. 'नवरी मिळे हिटलरला' ही मालिका गेल्यावर्षी मार्च महिन्यात प्रेक्षकांच्या भेटीला आली होती. २५ मे रोजी या मालिकेचा अखेरचा भाग प्रदर्शित झाला. मालिकेच्या शेवटच्या दिवशी सेटवर सगळेच कलाकार भावुक झाल्याचं पाहायला मिळालं. 'नवरी मिळे हिटलरला' या मालिकेत सरस्वती जहागीरदार ही भूमिका साकारणाऱ्या अभिनेत्री भूमिका पाटीलने युट्यूबवर व्हिडीओ शेअर करत सेटवरच्या शेवटच्या दिवसाची झलक सर्वांना दाखवली. यावेळी पॅकअप झाल्यावर सगळेजण भावुक झाल्याचं पाहायला मिळालं. या मालिकेची मुख्य नायिका लीला म्हणजे वल्लरी विराजला अश्रू अनावर झाले होते.



'नवरी मिळे हिटलरला' मालिकेच्या सेटवर शेवटच्या दिवशी लीलाचा डोहाळेजेवणाचा कार्यक्रम पार पडला होता. या कार्यक्रमात जहागीरदारांच्या सुना व इतर मंडळी उत्साहात सहभागी झाली होती. हे शूट पार पडल्यावर सगळ्या गोष्टी आवरून सेटवर शेवटचं पॅकअप करण्यात आलं. याची झलक प्रेक्षकांना भूमिजाच्या व्हिडीओमध्ये पाहायला मिळते. यावेळी मुख्य नायिका लीला मालिकेच्या सगळ्या फॅन पेजेसनी शेअर केलेल्या इन्स्टा स्टोरीज पाहत असते...यादरम्यान तिचं मन भरून येतं. "सगळ्या फॅन पेजेसनी आपल्या मालिकेला निरोप देताना 'अभी ना जाओ छोडकर, के दिल अभी भरा नहीं' हे गाणं इन्स्टा स्टोरीजला लावलंय...मी खूप इमोशनल होतेय" असं लीला या व्हिडीओमध्ये सरस्वती आणि लक्ष्मी यांना सांगत असते. यानंतर अचानक तिचे डोळे पाणावतात आणि वल्लरी सेटवर भावुक झाल्याचं पाहायला मिळालं. यावेळी सरस्वती आणि लक्ष्मीने तिला धीर देत "रडू नकोस, आपलं ठरलंय ना नाही रडायचं" असं सांगितलं.

## पल्लवी जोशीचे सडेतोड उत्तर

विवेक अग्निहोत्री यांनी दिग्दर्शित केलेला 'द काश्मीर फाइल्स' हा चित्रपट ११ मार्च २०२२ रोजी प्रेक्षकांच्या भेटीला आला होता. तीन वर्षांनंतरही या चित्रपटाची सर्वत्र चर्चा होत आहे. चित्रपटच्या प्रदर्शनानंतर काही प्रेक्षकांनी या चित्रपटाचं भरभरून कौतुक केलं, तर काहींच्या मते हा एक विशिष्ट प्रोपगंडा (प्रचारकी) करणारा चित्रपट होता. प्रेक्षकांबरोबरच काही कलाकारांनीदेखील या चित्रपटाबद्दल समाजात फूट पाडण्याचा प्रयत्न, मुस्लिम समाजाबद्दल द्वेष निर्माण करणारा चित्रपट असल्याची टीका केली होती. अशातच या टीकाकारांना विवेक अग्निहोत्री यांच्या पत्नी व अभिनेत्री पल्लवी जोशी यांनी थेट उत्तर दिलं आहे. पल्लवी जोशींनी नुकताच 'आरपार'शी संवाद साधला. या संवादात त्यांनी 'काश्मीर फाइल्स'ला प्रचारकी चित्रपट बोलणाऱ्यांबद्दल प्रतिक्रिया व्यक्त केली. यावेळी त्या असं म्हणाल्या, "आमच्या चित्रपटाला प्रोपगंडा (प्रचारकी) चित्रपट म्हणणारे खूप असेही लोक होते, जे राजकीयदृष्ट्या प्रेरित होते. त्या लोकांचं ऐकून सामान्य प्रेक्षकसुद्धा बोलायला लागले. पण जे लोक असं बोलत होते, त्यांना आता वस्तुस्थिती कळली ना?" यापुढे त्या म्हणाल्या, "आम्ही फक्त काश्मिरी पंडितांबद्दल त्या चित्रपटात बोललो होतो. आम्ही त्यांच्या त्रासाबद्दल बोललो होतो. त्यांच्याशी आम्हाला काय घेणं-देणं असे म्हणणारे लोक होते. हा चित्रपट आणण्याचा उद्देशच हा होता, की ही काश्मीरची गोष्ट नाही तर ही आपल्या भारताची गोष्ट आहे. काश्मीरला तुम्ही वेगळं नका समजू." यानंतर पल्लवी जोशींनी सांगितलं, "काश्मीर खूप लांब आहे आणि तिकडे जाण्यासाठी दोन विमानांचा प्रवास करावा लागतो; म्हणून याचा अर्थ असा नाही की, त्यांची काहीतरी वेगळी ओळख आहे किंवा त्यांचं वेगळं अस्तित्व आहे.न



## अजय देवगणबरोबर बॉलीवूड चित्रपटात काम करण्याची इच्छा

'कराटे किड लेजेंड्स' हा चित्रपट लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. विशेष बाब म्हणजे अजय देवगणचा मुलगा युग आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रदर्शित होणाऱ्या चित्रपटातील पात्राला त्याचा आवाज देणार आहे. या चित्रपटात अजय देवगणने जॅकी चॅन यांच्या पात्राला आवाज दिला आहे.

आता अभिनेता अजय देवगण व जॅकी चॅनचा एक व्हिडीओ निर्मात्यांनी प्रदर्शित केला आहे. 'सोनी पिक्चर्स इंडिया'ने इन्स्टाग्रामवर एक व्हिडीओ शेअर केला आहे. या व्हिडीओमध्ये जॅकी चॅन व अजय देवगण यांच्यात संवाद सुरू असल्याचे पाहायला मिळत आहे. अजय देवगण जॅकी चानला म्हणतो की मी तुमचा खूप मोठा चाहता आहे. त्यानंतर मला भारतात येण्यासाठी आमंत्रित कर, असे म्हणत जॅकी चॅन यांनी अजयबरोबर बॉलीवूडमध्ये काम करण्याची इच्छा व्यक्त केली.

व्हिडीओमध्ये पुढे पाहायला मिळते की अजय देवगण जॅकी चॅनला म्हणतो की तुमच्याबरोबर काम करायला आवडेल. जॅकी अजय देवगणला असेही म्हणाताना दिसत आहेत की तू ॲक्शन सीन कर मी डान्स करतो. तसेच जॅकी चॅन 'कुंग फू योगा' चित्रपटातील डान्स स्टेप्स करून दाखवताना दिसत आहे. या चित्रपटात दिशा पटानी, सोनू सूद हे कलाकारदेखील दिसले होते. सोशल मीडियावर व्हिडिओ शेअर झाल्यानंतर अनेक चाहत्यांनी दोन्ही कलाकारांचे कौतुक केले. एका चाहत्याने लिहिले, "दोघांना एकत्र पाहण्याची वाट पाहत आहे", दुसऱ्या एका चाहत्याने लिहिले, "दोन दिग्गजांना एकत्र पाहणे आनंदाचे असणार आहे", आणखी एका नेटकऱ्याने लिहिले, "वाह", एका नेटकऱ्याने लिहिले, "या दोन दिग्गज कलाकारांना एकत्र पाहण्यास उत्सुक आहे."

# बंगळूरुला विजय अनिवार्य!

## आज लखनऊ सुपर जायंट्सचे आव्हान

| लखनऊ |
प्रतिनिधी : महाईन्यूज |

**रॉयल चॅलेंजर्स बंगळूरु इंडियन प्रीमियर लीगच्या (आयपीएल) अखेरच्या लढतीत मंगळवारी लखनऊ सुपर जायंट्सचा सामना करेल, तेव्हा त्यांचा प्रयत्न गुणतालिकेत शीर्ष दोन स्थानांमध्ये आपली जागा निश्चित करण्याचा असेल. तर दुसरीकडे लखनऊचा संघ हंगामाचा शेवट विजयाने करण्यासाठी प्रयत्नशील असेल.**



गुजरात टायटन्सच्या सलग पराभवांमुळे तिसऱ्या स्थानी असणाऱ्या बंगळूरुला शीर्ष दोन संघांमध्ये स्थान मिळवण्याची चांगली संधी आहे. 'आयपीएल'च्या गुणतालिकेत शीर्ष दोन स्थानी असणाऱ्या संघांना तिसऱ्या व चौथ्या स्थानावरील संघांपेक्षा अंतिम फेरी गाठण्याची अतिरिक्त संधी मिळते. बंगळूरुचे १७ गुण आहेत. त्यांना अग्रस्थान गाठायचे असल्यास हा सामना जिंकणे अनिवार्य आहे. मुंबई इंडियन्स व पंजाब किंग्ज या सामन्यातून कोणताही एक संघ गुजरात टायटन्सच्या (१८ गुण) पुढे जाण्यास सज्ज आहे. भारत-पाकिस्तान यांच्यातील संघर्षामुळे लीगला स्थगित करण्यात आले होते. त्यापूर्वी बंगळूरुचा संघ चांगल्या लयीत होता. त्यांनी सलग चार सामने जिंकले होते. मात्र, लीग स्थगित झाल्यानंतर बंगळूरुची लय प्रभावित झाली.

लीग पुन्हा सुरू झाल्यानंतर कोलकाता नाइट रायडर्सविरुद्ध त्यांचा सामना पावसामुळे झाला नाही. नंतर सनरायजर्स हैदराबादकडून त्यांना ४२ धावांनी पराभूत व्हावे लागले. ऑस्ट्रेलियाचा वेगवान गोलंदाज जोश हेझलवूडचे संघात पुनरागमन झाल्याने बंगळूरुचा आत्मविश्वास दुणावला असेल. हेझलवूडने संघासाठी १० सामन्यांत १८ गडी बाद केले आहे. स्पर्धेत सर्वाधिक बळी मिळवणाऱ्या गोलंदाजांमध्ये तो चौथ्या स्थानावर आहे. लखनऊच्या त्यांच्या घरच्या मैदानात पराभूत करणे सोपे नाही. गेल्या सामन्यात त्यांनी गुजरातला पराभूत केले. एडीन मार्करम, मिचेल मार्श आणि निकोलस पूरन यांनी लखनऊसाठी प्रभावी कामगिरी केली आहे. गुजरातविरुद्धच्या सामन्यात संघात स्थान मिळालेल्या विल ओरूरकेने चमक दाखवली. हंगामाच्या अखेरच्या सामन्यात ऋषभ पंतकडून धावांची अपेक्षा असेल.

### 'करो या मरो'

"बंगळूरुतील सामन्यात जिंकणं टीमसाठी अत्यावश्यक आहे, कारण पराभव झाल्यास त्या टीमला टुर्नामेंटमधून बाहेर जावं लागेल." अशा परिस्थितीत "बंगळूरुला विजय अनिवार्य!" हे विधान हे केवळ सामन्याचं महत्त्व दर्शवत नाही, तर त्या टीमच्या उर्वरित संधी आणि अस्तित्वाशी संबंधित आहे.

आयपीएल मध्ये जर एखादी टीम पॉईंट्स टेबलमध्ये खालच्या स्थानी असेल, आणि शेवटचा सामना बंगळूरुच्या स्टेडियमवर असेल, तर त्या सामन्यात जिंकणं त्यांच्यासाठी 'करो या मरो'सारखं असतं.

अशावेळी क्रीडा विश्लेषक किंवा कॉमेंटेटर म्हणतात, "बंगळूरुतील विजयच आता त्यांना पुढे नेऊ शकतो. – इथे पराभव म्हणजे थेट बाहेरचा रस्ता!"

# फलंदाजांमुळेच कसोटी मालिकेत अपयश

## भारताचा अनुभवी खेळाडू केएल राहुलचे कसोटी मालिकेबद्दल मत

| नवी दिल्ली |
प्रतिनिधी : महाईन्यूज |

**रोहित शर्मा आणि विराट कोहली यांच्या अनुपस्थितीत भारतीय संघ इंग्लंडविरुद्ध कसोटी मालिकेसाठी सज्ज होत असतानाच भारताचा प्रमुख फलंदाज केएल राहुल याने अलीकडच्या काळात फलंदाजीतील चुकांमुळेच कसोटी मालिकेत अपयश सहन करावे लागल्याची कबुली दिली.**



'आयपीएल'मधील दिल्ली कॅपिटल्स संघाचे आव्हान संपल्यानंतर दिलेल्या मुलाखतीत राहुलने आपली मते स्पष्टपणे मांडली. "गेल्या काही कसोटी मालिकांत आम्हाला फलंदाजी चांगली करायला हवी होती. फलंदाजांच्या अपयशामुळे कसोटी क्रिकेटमध्ये भारताला पराभवाचा सामना करावा लागला. घरच्या मैदानावर न्यूझीलंडविरुद्धची मालिका ३-० गमावली, त्यानंतर ऑस्ट्रेलियातही त्याच चुका केल्या," असे राहुल म्हणाला. घरच्या खेळपट्ट्यांची चांगली माहिती असतानादेखील न्यूझीलंड गोलंदाजांनी आम्हाला शांत ठेवण्याचा मार्ग शोधून काढला. भारतीय फलंदाज धावांसाठी धडपडत होते आणि दबावाखाली खराब फटके खेळून गेले, असेही राहुलने नमूद केले.

खेळपट्टी फिरकीला साथ देणाऱ्या होत्या. आमच्याकडे दर्जेदार फिरकी गोलंदाजी होते. पण, न्यूझीलंडला आमच्यावर दबाव आणणे जमले. आम्ही चांगली फलंदाजी केली असती, तर मालिका वाचवू शकलो असतो, अशीही कबुली राहुलने दिली. स्वतःच्या फलंदाजी क्रमांकाविषयी बोलताना राहुलने संघाची गरज हाच आपल्या फलंदाजीचा क्रमांक असल्याचे सांगितले. दशकाहून अधिक काळाच्या कारकीर्दीत राहुलची संघातील फलंदाजीची जागा निश्चित नाही. "संघाची गरज ओळखून खेळात बदल करण्यात मी नेहमी तयार असतो. कर्णधार किंवा निवड समितीसमोर बसून मी काय करू शकतो असे सांगणे मला कधी जमले नाही. त्यामुळे समोर येईल त्या क्रमांकावर फलंदाजी करण्याचा मार्ग कायम निवडला," असे राहुल म्हणाला.

### ट्वेन्टी20 विश्वचषक माझे लक्ष्य

राहुलने आपल्याला ट्वेन्टी-२० क्रिकेटसाठी भारतीय संघात पुन्हा स्थान मिळवायचे आहे. ट्वेन्टी-२० विश्वचषक स्पर्धा हे माझे लक्ष्य असल्याचे सांगितले. "खेळ खूप पुढे गेला आहे. वेगवान झाला आहे. त्यामुळे मी कुठे सुधारणा करू शकतो, खेळाशी जुळवून घेण्यासाठी मला काय करावे लागेल, संघात पुन्हा स्थान मिळविण्यासाठी काय करता येईल याचा सध्या मी विचार करत आहे," असे राहुल म्हणाला. यंदाच्या 'आयपीएल'मध्ये दिल्ली कॅपिटल्सचे आव्हान संपुष्टात आले असले, तरी राहुलने पाचशेहून अधिक धावा करून आपली छाप पाडली आहे. 'आयपीएल'मध्ये सहभाग नोंदवताना पाचव्यांदा राहुलने पाचशेपेक्षा अधिक धावा करण्याची कामगिरी केली आहे.

### के. एल. राहुल याचे विधान

"मागील काही कसोटी मालिकांकडे पाहता, आम्हाला निश्चितच चांगली फलंदाजी करायला हवी होती. घरच्या परिस्थितीत तीन कसोटी सामने गमावणे, जिथे आम्ही क्वचितच पराभूत झालो आहोत, हे निराशाजनक आहे." राहुल यांनी न्यूझीलंडविरुद्धच्या मालिकेत संघाला सहज धावा मिळू न दिल्यामुळे दबाव निर्माण झाला आणि त्यामुळे खेळाडूंनी चुकीचे फटके खेळले, असे सांगितले. ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या मालिकेतही संघाने महत्त्वाच्या क्षणांमध्ये चुक केल्याचे त्यांनी मान्य केले. राहुल यांनी इंग्लंडमधील आगामी कसोटी मालिकेकडे "नव्या युगाची सुरुवात" म्हणून पाहत, संघाच्या पुनरागमनाबाबत आशावाद व्यक्त केला. रोहित शर्मा आणि विराट कोहली यांच्या निवृत्तीनंतर, राहुल यांच्यावर फलंदाजीतील अनुभवाचे ओझे आहे.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज™

ePaper

। मंगळवार ।
। दि. 27 मे 2025 ।

epaper.mahaenews.com

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती



KAMALA Education Society

KAMALA EDUCATION SOCIETY'S

## PRATIBHA INSTITUTE OF BUSINESS MANAGEMENT

AICTE Permanent ID: 1-3675161 | DTE Code: 6167

Approved by AICTE | B+ NAAC Accredited | Permanently Affiliated to Savitribai Phule Pune University

# ADMISSIONS OPEN

Full Time Undergraduate Courses (3 Years Degree Course, 4 Years Honours)



**BBA**

**Bachelor of Business Administration**



**BCA**

**Bachelor of Computer Applications**

### Highlights:

- Advanced Industrial and Research Learning
- Proven Track Record of Placements
- Mentoring and Seed Funds for Startups
- Skill Development and Certification Courses
- Live Industrial Projects
- Earn and Learn Scheme of Rs. 10,00,000+
- Govt. and Management Scholarships
- State of the Art infrastructure
- ICT enabled classrooms

Eligibility: Passed HSC Examination with any stream

**Call for more details:**

**BBA : Prof. Gururaj - 8624991767 | Dr. Pallavi - 9225635556**

**BCA : Prof. Manish - 9823223336 | Prof. Surabhi - 9049004895**

www.pibmpune.org.in

Scan QR code to know more

## (पीसीसीओई) मध्ये ‘क्षितिज - 2025’ शोकेस

# पेटंटमुळे व्यावसायिक उत्पादनास चालना - बाबर

### शिक्षण विश्व: पीसीसीओई मध्ये ‘क्षितिज – 2025’ शोकेस प्रदर्शनास उत्स्फूर्त प्रतिसाद



**। पिंपरी- चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

**शैक्षणिक काळात विद्यार्थी अनेक प्रकल्प सादर करतात. सामाजिक दृष्टिकोन समोर ठेवून तयार केलेल्या प्रकल्पांना व्यावसायिकतेची जोड दिली तर आर्थिक विकासाला चालना मिळते. विद्यार्थ्यांनी या दृष्टीने विचार करण्याची गरज आहे. असे प्रतिपादन कॉमसेन्स टेक्नॉलॉजीजचे सह-संस्थापक, अध्यक्ष आणि मुख्य एआय अधिकारी सागर बाबर यांनी केले.**

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या (पीसीईटी) निगडी येथील पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (पीसीसीओई) मध्ये ‘क्षितिज - २०२५’ शोकेसचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सागर बाबर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी पबमॅटिक इंजिनिअरिंगचे सहसंस्थापक आणि अध्यक्ष मुकुल कुमार, टाटा मोटर्सचे सरव्यवस्थापक बीएसके रेड्डी, पीसीईटीचे कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई, पीसीसीओईचे संचालक डॉ. गोविंद कुलकर्णी, विकास व संशोधन अधिष्ठाता डॉ. नरेंद्र देवरे संयोजक दीप्ती खुर्गे, सह-संयोजक डॉ. केतन देसले विविध विद्याशाखांचे प्रमुख प्राध्यापक विद्यार्थी उपस्थित होते. क्षितिज २५ मध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता, कॉम्प्युटर इंजीनियरिंग, मेकॅनिकल इंजिनिअरिंग, सिव्हिल इंजीनियरिंग, दूरसंचार, माहिती तंत्रज्ञान आदी विभागातील पेटंट मिळण्यायोग्य २८ प्रकल्प सादर करण्यात आले.

भारतीय विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड ज्ञानसंपदा आहे. विद्यार्थ्यांनी जनसामान्यांना भेडसावणाऱ्या अडचणींचा विचार करून सामाजिक उन्नतीच्या दृष्टीने प्रकल्प सादर केले पाहिजेत आणि त्याची नोंदणी करणे म्हणजेच पेटंट घेणे आवश्यक आहे. त्यामुळे व्यावसायिक उत्पादन करण्यास मदत मिळते, असे मुकुल कुमार म्हणाले.

पीसीसीओईने विद्यार्थ्यांच्या कल्पनांना मुक्त व्यासपीठ क्षितिज च्या रूपाने दिले आहे. यामुळे विद्यार्थ्यांच्या वैचारिक सामाजिक जाणीवांना नवा आयाम मिळतो हे कौतुकास्पद आहे याचे अनुकरण सर्वांनी केले पाहिजे. पीसीसीओई सातत्याने नवनवीन प्रकल्प सादर करून जबाबदार नागरिक घडवण्याचे काम करीत आहे हे सामाजिक विकासासाठी उपयुक्त आहे असे रेड्डी म्हणाले.

क्षितिज प्रदर्शनास औद्योगिक क्षेत्रातील दोनशे प्रतिनिधी उपस्थित होते. शाश्वत विकास उद्दिष्टे आणि वास्तविक - जागतिक प्रभाव याची माहिती मिळावी तसेच नवकल्पना आणि उद्योजकतेला चालना देण्यासाठी पीसीसीओईहे प्रदर्शन आयोजित करते. क्षितिज शोकेसचे हे चौथे वर्ष आहे. व्हिएलएसआय आणि एम्बेडेड सिस्टम, आर्टिफिशियल इंटेलिजन्स आणि डेटा सायन्स, कन्स्ट्रक्शन मॅनेजमेंट आणि मेकॅनिकल डिझाइन या विषयावर विद्यार्थ्यांनी प्रकल्प सादर केले. प्रकल्पांमधील कल्पकता आणि तांत्रिक कौशल्ये विकसित करून विद्यार्थ्यांनी उद्योग जगतातील उपस्थित प्रतिनिधींचे लक्ष वेधून घेतले.

सादर केलेल्या सर्जनशील आणि व्यावहारिक उपयोगी प्रकल्पांचे कौतुक करून अनेक प्रतिनिधींनी पुढील सहकार्य करण्यास किंवा निवडलेल्या प्रकल्पांच्या निरंतरता आणि व्यवसायिकतेसाठी गुंतवणूक करण्यास उत्सुकता व्यक्त केली. स्वागत, प्रास्ताविक डॉ. गोविंद कुलकर्णी, सूत्रसंचालन डॉ. दिप्ती खुर्गे आणि आभार डॉ. केतन देसले यांनी मानले.

पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त तथा पीसीयुचे कुलपती हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046


MASTER MIND GLOBAL
SCHOOL & Jr. College
(CBSE)
( Since 2013)
ADMISSIONS
OPEN FOR
NURSERY TO 12TH
Where There is
Creativity, There is
Master Mind
7
STAR
RANKING
Excellence in Education & Disciplined Environment
Co-Curricular & Extra Curricular Activities
Guaranteed Safety & Security
A++ Grade
In Leadership & Quality
Management
Contact : +91 7218125125
E-mail : mastermindglobalschool.com
Website : www.http://mastermindglobalschool.com


BLOSSOM YOUR KNOWLEDGE
Swami Vivekanand Shikshan Prasarak Mandal's
GAYATRI GROUP OF SCHOOLS,
PUNE
ADMISSIONS OPEN
2025-26
PRE-PRIMARY
TO
HIGHER-SECONDARY
For more info
95277 64646 / 77967 67292


Late Babanrao Gabaji Gawali Charitable Trust's
SPG INTERNATIONAL PUBLIC SCHOOL & JUNIOR COLLEGE
SPG INTERNATIONAL PUBLIC SCHOOL & JR. COLLEGE
WE MAKE YOUR FUTURE
Powered by
JAI HIND EDUTECH
CBSE Affiliation No. : 1130741 • UDISE Code - 27252001012
BHOSARI CAMPUS : Sr. No. 203, Nr. Durwankur Lawns, Alandi Road, Bhosari, Pune-411039 (Maharashtra)
SPG INTERNATIONAL PUBLIC SCHOOL
Pre Primary to Class XII
LIMITED SEATS
Hurry up!!!
ADMISSION
OPEN
2025-2026
Bi-focal / Technical / Vocational Subject are available
For Science Stream
• Computer Science
• Crop Science
• Electronics
• Mechanical / Technical Automobile
• Information Technology (IT)
For Commerce Stream
• Banking
• Marketing & Sales
• Office Management
• Small Industries & Self employment
• Information Technology (IT)
CALL NOW : 9763441639 / 8657473241